महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवीमुंबई-४००७०३.
M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

परिपत्रक क्रमांक : मुंविमं/उमाप/फेब्रुवारी-मार्च २०१८/गुणपत्रिका वाटप/५०७/दि. ०१/०६/२०१८

विषय : **फेब्रुवारी-मार्च २०१८ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचे गुणपत्रक वाटपाबाबत....**

मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०१८ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातून प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या निकालाच्या **गुणपत्रिका व अभिलेखासाठी एकत्रित यादी ( कन्सोलिडेटेड कॉलेज रजिस्टर ) मंगळवार, दिनांक १२/६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता वितरण केंद्रांवर वाटप करण्यात येणार आहे.** कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी अधिकारपत्रासह प्रतिनिधी पाठवून सदर गुणपत्रके व इतर साहित्य ताब्यात घेण्याची व्यवस्था करावी. विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप त्याच दिवशी म्हणजे मंगळवार दि. १२/६/२०१८ रोजी दु. ३.०० वाजता करण्यात यावे.

आपणांस प्राप्त झालेल्या गुणपत्रिका आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येनुसार आहेत किंवा नाही याची खातरजमा करावी. गुणपत्रिका अन्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या असल्यास त्वरीत मंडळाकडे कनिष्ठ महाविद्यालयाच्या पत्रासह जमा करण्यात याव्यात. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या असलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा गुणपत्रिका **कमी/जास्त** असल्यास तसेच गुणपत्रिकेत काही दुरूस्त्या/त्रुटी असल्यास गुणपत्रिका मिळालेल्या दिनांकापासून **०७ दिवसांच्या आत** त्याबाबत मंडळाच्या लेखी निदर्शनास आणावे त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत त्रुटी लक्षात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष बोरसे )
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३.

Telephone : 27652445, 27662504, 27881077, 27881075, 27899987 * Fax : 27659491 / 27881349
Email : sscboard@vsnl.com * Website : www.sscboardmumbai.in

Scanned by CamScanner

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

हाराष्ट्र राज्य
ाध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
।.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघार
सर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
णे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 Fax : 25665807 । Secretary(P) : 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-३/ २८७४
दिनांक- ३१/०५/२०१८

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषयः- जुलै-ऑगस्ट २०१८ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखांबाबत...

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुलै-ऑगस्ट २०१८ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस नियमित, पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे-

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | सोमवार, दिनांक ०४/०६/२०१८ ते बुधवार, दिनांक १३/०६/२०१८ | गुरुवार, दिनांक १४/०६/२०१८ ते सोमवार, दिनांक १८/०६/२०१८ | सोमवार दिनांक २५/०६/२०१८ (वितरण केंद्रावर) |
| विलंब शुल्क | गुरुवार, दिनांक १४/०६/२०१८ ते सोमवार, दिनांक १८/०६/२०१८ | मंगळवार, दिनांक १९/०६/२०१८ ते शुक्रवार, दिनांक २२/०६/२०१८ | |

Scanned by CamScanner

३.ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रुवारी-मार्च २०१८ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

४.नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

५.उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२ वी) परीक्षा सप्टेंबर-ऑक्टोबर २०१८ मध्ये घेतली जाणार नाही याची विद्यार्थी, पालक मुख्याध्यापक व सर्व संबंधित यांनी नोंद घ्यावी.

६.आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावायाच्या तारखामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

प्र.सचिव,
राज्यमंडळ, पुणे -०४

क्रमांक :मुंविमं/उमाप/ 80L
वाशी नवी मुंबई-४०० ७०३
दिनांक ०१/०६/२०१८..

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
जिल्हा-मुंबई/ठाणे/रायगड/पालघर

आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्य.प्रमाणपत्र परीक्षा जुलै २०१८ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने उपरोक्त नमुद तारखां व सुचनांप्रमाणे ऑनलाईन भरण्यात यावीत.

1/6/18
(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

Scanned by CamScanner